# मुंबई महानगरीचे इंजिनिअरिंग...



अभियंता म्हणजे शहराच्या विकासाचा शिल्पकार. मोनो, मेट्रो, मोठमोठे उड्डाणपूल, इमारती असो किंवा ब्रिटीशकालीन वास्तुंची देखभाल असो. अभियंत्यांशिवाय हे केवळ अशक्य... अभियंत्यांच्या हातात कुठल्याही शहराला नवा आकार देण्याची कला असते. पायाभुत सुविधांसाठीही अभियंत्यांचेच हात महत्वाचे. मग ते नाले सफासफाई असो किंवा नळजोडणी असो. पाण्याचा निचरा होण्यासाठी शहरात आकाराला आलेली आणि निर्माणाधीन असलेली पंपिंग स्टेशन्सही या अभियंत्यांच्याच हाताची जादू. कोस्टल रोडही तयार होतोय... मुंबई शहर हे हळुहळू विकासाचा नवा अध्याय रचत आहे. या अध्यायाच्या रथाचा सारथी हा अभियंताच आहे. अभियंता आणि भारतरत्न एम. विश्वेश्वरय्या यांच्या वाढदिवसानिमित्त १५ सप्टेंबर हा दिवस देशभरात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. शहराच्या विकासाचा पाया आणखी मजबूत करणाऱ्या तसेच नवनव्या कल्पना आकाराला आणणाऱ्या सर्व अभियंत्यांना त्यानिमित्ताने शुभेच्छा...



वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून गेट वे ऑफ इंडिया ओळखले जाते. इंग्लंडचा राजा पाचवा जॉर्ज यांच्या भेटीच्या स्मरणार्थ हे प्रवेशद्वार उभारण्यात आले.



त्यावेळच्या व्हिक्टोरीया टर्मिनससमोर तत्कालीन गव्हर्नर हॉर्नबी व बॉम्बे इंजिनीयर्सचे कर्नल जे.डी क्रुकशांक यांच्या स्मरणार्थ नावे दिलेल्या जागेत पालिकेची वास्तू उभारली.



१६ एप्रिल १८५३ रोजी पहिली रेल्वे सुरु झाली. त्याकाळात मुंबई ते ठाणे अशी पहिली ट्रेन धावली. सध्या मुंबईच्या या जीवनवाहिनीतून रोज लाखो, करोडो मुंबईकर प्रवास करतात.



उपनगरीय गाडीला पर्याय म्हणून आलेल्या मेट्रो लाइनकडे आधी मुंबईकर जरा संशयानेच पहात होते. मात्र, आता मेट्रो सेवा मुंबईकरांच्या अंगवळणी पडली आहे.



मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात मेट्रोची उभारणी हा अभियांत्रिकी क्षेत्रातील अद्भुत चमत्कारच ठरला आहे. भुयारी मेट्रोने त्यात आणखी भर घातली आहे.



'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' या मुंबईतील पहिल्यावहिल्या भुयारी मेट्रो प्रकल्पाअंतर्गत अलीकडेच प्रथमच भुयारी मार्गावरून मेट्रो धावली.